**ललिता गंडभीर**
LALITA GANDBHIR
4200N.OCEAN DRIVE, 1501-2
RIVIERA BEACH,
FL 33404,USA.

# रंगेल अल्डोची गोष्ट

अल्डो पिली अमेरिकेला डॉक्टर होऊन आला तेव्हा पंचविशीतला रंगेल तरुण होता. मेडिकलचे शिक्षण त्याने नुकतेच पूर्ण केले होते. डिग्री मिळाल्याबरोबर पुढे काही काम सुरु करण्याआधी दोन महिने सुट्टी घेऊन अमेरिका पाहावी व त्याच्या दहा वर्षांपूर्वी अमेरिकेत आलेल्या काकांना भेटून यावे अशा दुहेरी हेतूने त्याने काकांच्या अमेरिकेहून आलेल्या आमंत्रणाचा स्वीकार केला होता. काका-पुतण्यांत फक्त दहा वर्षांचा फरक होता. लहानपणी अल्डो अनेकदा काकांबरोबर त्यांच्या घरीच राहत असे. त्यामुळे दोघांनाही एकमेकांची खूप ओढ होती. काकांनी अमेरिकेत आल्यावर सुरुवातीला खूप कष्ट करून एक इटॅलियन रेस्टॉरंट विकत घेतलं होतं. ते रेस्टॉरंट चालवण्यात त्यांचा सगळा वेळ जात असे. म्हणूनच त्यांना लग्न वगैरे फालतू गोष्टींचा विचार करायला वेळ मिळाला नव्हता. ते एकटेच एका प्रशस्त घरात राहत होते.

अल्डो आल्यावर त्यांना खूप आनंद झाला. रेस्टॉरंटच्या कामातून वेळ काढून ते अल्डोबरोबर सगळीकडे हिंडून आले. संध्याकाळी अल्डो त्यांच्याबरोबर रेस्टॉरंटमध्ये जात असे. तिथे रोज संध्याकाळी बँडच्या म्युझिकवर डान्स चाललेला असे. अल्डोला डान्स आणि सुंदर मुली यांचा खूप छंद होता. तो एकटाच काकांबरोबर असला तरी त्याला पार्टनर मिळवायचा कधीच त्रास पडला नाही. रेस्टॉरंटमधल्या बारसमोर ठेवलेल्या स्टुलावर बसून अल्डो येणाऱ्या गिऱ्हाइकांची टेहळणी करत असे. मग त्यातल्या त्यात तरुण व सुंदर स्त्रिया हेरून ठेवत असे. थोड्या वेळाने एखाद्या सुंदर स्त्रीला वाकून अभिवादन करून मोडक्या-तोडक्या इटॅलियनमिश्रित इंग्लिशमध्ये डान्स करण्याची विनंती करत असे. अल्डोचे बोलणे नीट समजले नाही तर पुढे केलेल्या हातावरून बायका काय ते सहज समजत. रोमन पुतळ्यासारखे धारदार नाक,कुरळे काळे केस,मिस्किल तपकिरी डोळे,काळी पँट,पांढरा कोट,सॅटिनचा पांढरा शर्ट काळा बो,टाय आणि नजरेत भरणारी उंच भरदार शरीरयष्टी. अशा ‘अल्डोला’ पाहून बायका तर भाळूनच जात. सबंध संध्याकाळ अल्डो वेगवेगळ्या सौंदर्यवतींबरोबर डान्स करण्यात घालवत असे.

अल्डोबरोबर डान्स केलेल्या काही काही मुली डान्स करण्यासाठी परत येऊ लागल्या. अल्डोला उत्तम डान्स येतच होता. त्याचा स्वभावही फार विनोदी,मोकळा व खेळकर होता. तो असला की आसपासची माणसे सारखी हसत असायची. त्यामुळे दीड-दोन महिन्यांतच त्याच्या खूप ओळखी झाल्या व तो लोकप्रिय झाला. अल्डोच्या काकांना कळले की अल्डोमुळे त्यांच्या

रेस्टॉरंटचा फायदा वाढतच चालला आहे. त्यांनी अल्डोला "आणखी एक महिनाभर राहा." असा आग्रह केला. "रोज सायंकाळी रेस्टॉरंटमध्ये येऊन बसण्यासाठी पैसे देतो" असेही कबूल केले. काकांच्या आग्रहावरून अल्डोने आपला मुक्काम आणखी थोडा वाढविला.

रेस्टॉरंटमध्ये त्याला ट्रेसी भेटली. ती एक नर्स होती. बोलता बोलता ती 'मला एक इटालियन डॉक्टर ठाऊक आहे. आमच्या हॉस्पिटलमध्ये रेसिडन्सी करतो आहे.' असे बोलून गेली. अल्डोने त्या डॉक्टरला,जोला ट्रेसीतर्फे रेस्टॉरंटमध्ये येण्याचे आमंत्रण दिले.

जोकडून त्याला अमेरिकेत कायम राहायचे असेल तर परीक्षा घेऊन अर्ज कसे व कुठे करावयाचे ह्याची माहिती मिळाली. अल्डोला इटलीमध्ये हे बरेच काही ठाऊक होतेच. पण अल्डोच्या काकाला अल्डोला अमेरिकेत कायम राहता येणे शक्य आहे हे ज्ञान जोकरवी झाले. तो खुश झाला व अल्डोला अमेरिकेत कायम राहण्याचा आग्रह करू लागला. आपलं घर आहेच. 'आठवड्यातून तीन-चार वेळा विशेषतः शनिवार रविवारी रेस्टॉरंटमध्ये ये, तुला पगारही देईन.' वगैरे पुन्हा पुन्हा म्हणू लागला.

शेवटी अल्डोने वर्ष दोन वर्षे अमेरिकेत राहण्याचं ठरविलं. काही परीक्षा दिल्या. त्याला गावात रेसिडन्सी मिळाली. त्याची रेस्टॉरंटमधली डान्स करण्याची नोकरी पण चालू राहिली. पाच-सहा वर्षांनी अल्डोने इंटर्नल मेडिसिनच्या बोर्डाची परीक्षा दिली. तो पास झाला. ट्रेसीची व त्याची मैत्री दिवसेंदिवस वाढतच गेली. शेवटी अनेक मैत्रिणींमधून ट्रेसीची निवड करून तीन-चार वर्षांनी अल्डोने एकदाचे लग्न केले. मग काकांकडून अल्डोने आपले प्रस्थान हलविले व तो ट्रेसीसह तिच्या अपार्टमेंटमध्ये राहू लागला.

बोर्डाची परीक्षा दिल्यावर अल्डोला व ट्रेसीला पहिल्या बाळाची चाहूल लागली. आता अल्डोला कुठे तरी कायमची प्रॅक्टिस सुरु करून एका जागी बिऱ्हाड करण्याची आवश्यकता होती. म्हणून त्याने प्रॅक्टिस करायला योग्य गाव शोधायला सुरुवात केली.

'मला की नाही व्हरमॉंटला परत जायचंय. इथं बॉस्टनला आपलं ठीक होतं. पण मुलांना वाढविण्याच्या दृष्टीने व्हरमॉंटच योग्य' असे ट्रेसीने ठासून सांगितले. त्याच सुमाराला काकांनी लग्न केले आणि रेस्टॉरंट विकून फ्लॉरिडाला गरम हवेत राहायला जायचे ठरविले. अल्डोच्या नात्याचे असे बॉस्टनला आणखी कोणीच माणूस नव्हते. आपल्या आई-वडिलांजवळ नाही तर ट्रेसीच्या आई-वडिलांजवळ राहू असा अल्डोने विचार केला व व्हरमॉंटला जायचे कबूल केले.

अल्डोने पूर्वी व्हरमॉंट पहिले होते. हिरव्यागार झाडांनी आच्छादिलेले डोंगर,मधून खळखळत वाहणारे झरे,छोटी छोटी तळी,लहान गावे,मधून मधून लागणारी शेतकऱ्यांची घरे व गायींचे मोठे गोठे,डोंगरावर चरणाऱ्या गाई असा निसर्ग-सौंदर्याने नटलेला तो प्रांत होता.

ट्रेसी ग्रोटन या लहानशा गावात वाढली होती. तिचे बरेच नातेवाईकही तिथेच राहत होते. त्या गावात चिमुकले हॉस्पिटल,छोटी बाजारपेठ आणि आठवीपर्यंत शाळा होती. आसपासच्या

गावाची माणसे डॉक्टर लागला तर,खरेदीसाठी याच गावात येत. एकूण अल्डोला ते गाव पसंत पडले.

त्याने हॉस्पिटलमध्ये प्रिव्हिलेजेस मिळवण्यासाठी अर्ज केला. तिथेच त्याला डॉ. बर्नस भेटले. अल्डो त्यांच्या ऑफिसात इंटरव्ह्यूसाठी गेला तेव्हा ते त्यांच्या प्रचंड डेस्कमागच्या फिरत्या खुर्चीवर बसून केस हिस्टरी वाचत होते. अल्डोला पाहताच ते संथपणे उठून उभे राहिले. त्या धीर-गंभीर,पहाडी,अर्धवट पिकलेल्या केसांच्या व भेदक निळ्या डोळ्यांच्या पुरुषाकडे पाहताना अल्डोला आपण त्याच्यापुढे अगदीच पोरकट दिसतो असे तीव्रतेने जाणवले. त्याने चेहऱ्यावर गांभीर्य आणण्याचा व्यर्थ प्रयत्न केला आणि डॉ.बर्नसशी हस्तांदोलन केले. पुढचा इंटरव्ह्यू ठीक झाला. एक-दोनदा फालतू विनोद करायचा मोह अल्डोने कटाक्षाने टाळला. अल्डोच्या लक्षात आले की डॉ. बर्नस खूप हुशार आहेत. त्यांना मेडिसिनचेच नव्हे तर इतर विषयांचे पण बरेच ज्ञान आहे. एकूण डॉ. बर्नसची अल्डोवरच मोठी छाप पडली. इंटरव्ह्यू संपवून बाहेर पडताना अल्डोला डॉ. बर्नसची तरुण व सुंदर सेक्रेटरी ऑफिसबाहेर भेटली. अल्डोला पाहून तिने डोळे व भुवया उडवल्या आणि खुर्चीवरून उठून हात पुढे करत ती हसत म्हणाली, “डॉ. पिली,तुम्हाला आमचं गाव आवडतं ना? तुम्ही इकडे प्रॅक्टिस सुरु करणार ना नक्की?” अल्डो एकदम नेहमीच्याच वळणावर गेला. दोन्ही हातांनी त्याने तिचा हात पकडला, “अर्थातच तुझ्यासारख्या सुंदर मुली असल्यावर मी दुसरीकडे जाईनच कसा?” तो तिला हसत म्हणाला.

“तुमच्यासारख्या डॉक्टरचीच मी वाट पाहत होते.” ती डोळे आणि केस उडवत म्हणाली.

“ते मला कळलेच होते. म्हणूनच मी आलो.” आता अल्डोने तिच्या पाठीवर चक्क थाप मारली. अचानक तिच्या चेहऱ्यावरचे हसू नाहीसे झाले. आणि आपल्याजवळ कुणी उभे आहे असा अल्डोला भास झाला. त्याने मागे वळून पहिले. डॉक्टर बर्नस मागे उभे होते. त्यांच्या चेहऱ्यावरच्या गांभीर्यामागे थोडी नाराजी आहे असा अल्डोला भास झाला. त्याने सेक्रेटरीकडे पाहिले. क्षणार्धात टाइपरायटरपुढे बसून टाईप करण्यात ती गर्क झाली होती, किंवा तसा आव आणला होता असे म्हणणेच जास्त योग्य होईल.

“डॉ. पिली,जरा ऑफिसमध्ये या.” असे म्हणत अल्डो आत आल्यावर डॉक्टर बर्नसने मधला दरवाजा बंद केला. चार-पाच क्षण ते शांतच राहिले. “भलतीच चूक झाली. लग्न झाले. आता आपण एका पोराचा बापही होणार तरी मुलींमागे लागायची सवय काही जात नाही आपली!” अल्डोमनातून पस्तावत होता. ट्रेसीची व त्याची ह्याच कारणाने भांडणे होत असत. सुंदर मुलगी दिसली की अल्डो पाघळलाच म्हणून समजावे.

“हे पाहा डॉ.पिली” डॉ. बर्नसने धीरगंभीरपणे सुरुवात केली. “हे बॉस्टन नाही. लहानसे गाव आहे. इथे प्रत्येकजण एकमेकाला ओळखतो,डॉक्टरांना इथे खूपच महत्व असते. त्यांनी आपली पत स्वतःच राखली पाहिजे. नर्सेसशी,इतर हॉस्पिटल मधल्या स्टाफशी (Staff) बोलणे,वागणे कसे चोख पाहिजे. कुणाला नाव ठेवायला संधी मिळता कामा नाही. एका डॉक्टरच्या दुर्वर्तनाने सगळ्या

डॉक्टरांना कमीपणा येतो. ह्या हॉस्पिटलमध्ये आमच्या स्टाफवर यायचे असेल तर आपला आब राखून वागा ...”

अल्डो ‘हो,समजलं’ असे काही पुटपुटला आणि ऑफिसच्याबाहेर पडला. जाताना त्याने सेक्रेटरीच्या दिशेने दृष्टीक्षेपसुद्धा टाकला नाही. तो बाहेर पडताना सेक्रेटरी खाली मान घालून ‘थेरडा डॉ.बर्नस’ असे दाताखाली ओठ दाबून हळूच म्हणाली होती, हेही त्याला ऐकू गेले नाही.

हॉस्पिटलमधल्या इतर डॉक्टरांना भेटल्यावर अल्डोला डॉ.बर्नसची आणखी माहिती मिळाली. ते खूप सीनियर होते व मेडिकल स्टाफचे प्रमुख होते. गावात व हॉस्पिटलात ते प्रसिद्ध होते व गावातील लोक त्यांना फार मान देत असत.

हे सर्व ऐकून इथे राहायचे असेल तर डॉ.बर्नसचा आदेश मानून बोलण्यातले आणि वागण्यातले वळण बदलायला हवे असा निष्कर्ष अल्डोने काढला. अल्डोला हॉस्पिटलमध्ये प्रिव्हिलेजेस मिळाले. त्याने दवाखाना उघडला. ट्रेसीनें नवीन घर पसंत करून ते विकत घेतले. अल्डो व ट्रेसीने आपला संसार थाटला.

अल्डोने स्वतःची वागणूक बदलायचा प्रयत्न कसोशीने सुरु केला. सुंदर बायका दिसल्या की तो प्रयत्नाने नजर दुसरीकडे फिरवायचा. उगाच विनोद करायचा मोह टाळायचा. जोराने हसायचे बंद करून तो मंद स्मित करायच्या प्रयत्नात असायचा. त्याच्या हळूहळू लक्षात आले की इतर सर्व डॉक्टर पण काही अगदी धुतल्या तांदळासारखे नाहीत. एका डॉक्टरचे बाहेर प्रेमप्रकरण चालले होते. त्याच्या बायकोला सोडून अख्या गावाला ते प्रेमप्रकरण ज्ञात होते. एक डॉक्टर मधून मधून बारमध्ये बसून दारू पीत फालतू बडबड करत बसायचा. बारचा मालक त्याला रात्री घरी पोहोचवायचा.

पण अल्डोने या सर्व अफवांशी आपला संबंध नाही असे ठरविले. त्याच्या डिपार्टमेंटचे प्रमुख डॉ. बर्नस आदर्श मानले जात व त्यांनी दाखविलेल्या मार्गाने अल्डोने वाटचाल सुरु केली. मधूनमधून अल्डो बॉस्टनच्या मित्रांना भेटायला,त्यांच्याशी पोकर किंवा तीन पत्ती खेळायला जात असे. त्यावेळी खरा अल्डो उफाळून बाहेर येत असे. मनसोक्त हसणे,खिदळणे होऊन गेले की अल्डोला मोकळे वाटायचे.

ट्रेसीला पण अल्डोतला फरक जाणवला “मुलींशी फ्लर्ट करायचं तू थांबलास ते पसंत आहे मला.” ट्रेसी अल्डोला एकदा म्हणाली, “पण दिवसभर असा सुतकी गंभीर चेहरा करून का बसतोस? पूर्वीसारखा का वागत नाहीस?”

“डॉक्टर बर्नस” अल्डोने गंभीरपणे दोनच शब्दात उत्तर दिले. “डॉक्टर बर्नस? म्हणजे?” ट्रेसीने विचारले पण अल्डो काही पुढे बोललाच नाही.

अशीच सात-आठ वर्षे गेली. अल्डोची प्रॅक्टिस जोरात सुरु होती. अल्डो पूर्ण बदलला होता. त्याने स्वतःचे खरे व्यक्तिमत्व दाबून टाकले होते. त्याला दोन मुले झाली होती. ट्रेसीला आता त्याच्या बदललेल्या स्वभावाची सवय झाली होती.

एका हिवाळ्यात अल्डोने ट्रेसीबरोबर इटलीला जायचे ठरविले. इटलीला गेल्यावर अल्डोच्या दोन्ही धाकट्या भावांना अल्डोत झालेला फरक तीव्रतेने जाणवला. आणि मुळीच पसंत पडला नाही. त्यांना आपला पूर्वीचा रंगेल भाऊ पाहिजे होता. ते म्हणाले, "हे काय तू अगदी फिलॉसॉफरचा बाप झाला आहेस. हसत नाहीस,विनोद करत नाहीस अमेरिकेत असं थोडंच वागावं लागतं? काका आले होते ते तर तू मुलींवर छाप मारतोस,डान्स करतोस,सर्वांना हसवतोस असं सांगत होते."

"ते काका फॉरिडाला जाण्यापूर्वी. आता सगळं बदललंय." अल्डो सुस्कारा सोडून म्हणाला.

शेवटी दोन्ही भावांनी मिळून एक खास कट केला. अल्डो व ट्रेसीसह ते न्यू इयरच्या पार्टीला गावाबाहेर उघडलेल्या नव्या रेस्टॉरंटमध्ये गेले. ते दहा वाजता रेस्टॉरंटमध्ये पोहोचले तेव्हा रेस्टॉरंटमधील सर्व टेबल्स आधीच भरलेली होती. डान्स फ्लोअर मधोमध होते. डान्स फ्लोअरजवळ एकच टेबल मोकळे होते. मालकाने तिथे त्यांना अदबीने नेऊन बसविले. कानठळ्या बसणाऱ्या आवाजात बँडवादन चालले होते. मद्याने पेले भरून येत होते,पुन्हा रिते होऊन भरत होते. मंद दिव्याच्या प्रकाशात एक प्रकारची धुंदी त्या वातावरणात भरून सांडत होती.

अकरा वाजता दिवे क्षणभर बंद झाले. पुन्हा उजेड पडला तेव्हा डान्स फ्लोअरवर एक मोठे टेबल अवतीर्ण झाले होते. त्या टेबलावर पाच फूट उंचीचा खरा केक होता. बँडवाल्यांनी आणि इतर काही लोकांनी केकभोवती फेर धरला. थोड्या वेळाने परत दिवे बंद झाले,पुन्हा उजळले. तेव्हा केकच्या मध्यावर एक कमनीय,रेखीव नाका-डोळ्याची,सोनेरी केसांची,झगझगता लांडा बिनबाह्यांचा लाल ड्रेस घातलेली सुंदरी अवतरली होती. तिला पाहून 'आ...'असे आश्चर्योद्गार रेस्टॉरंटमध्ये घुमले. मग बऱ्याच शिट्या वाजल्या आणि बँड परत सुरु झाला. सुंदरीने थोडा वेळ केकवर आळोखेपिळोखे दिल्यासारखा नाच केला. मग तोंडात चॉकलेटचा तुकडा घेऊन ती खाली उतरली व बँड थांबला. तिने खुणावून अल्डोला बोलावले. अल्डोला सगळे ढकलायला लागले. तो हलला नाही हे पाहून सुंदरी जवळ आली. नाचत नाचत तोंडातले चॉकलेट घे म्हणून सांगू लागली. अल्डोला मोह पडू लागला. अल्डोने विचार केला, 'आपण यावेळी आहोत इटलीत. अमेरिकेतील बंधने कशाला पाळायची? इथे आपल्याला ओळखणारे आहे कोण?'

तो उठून तिच्यामागे गेला. ती त्याला नाचवू लागली. अल्डोला नाच येतच होता. तो तिच्या तोंडातले चॉकलेट आपल्या ओठांनी घ्यायचा प्रयत्न करत नाचू लागला. कुणीतरी केक खाली काढला. सुंदरी व मागून अल्डो टेबलावर चढले. सुंदरी अल्डोचे चॉकलेट घ्यायचे प्रयत्न चुकवत नाचत राहिली. लोक टाळ्या वाजवू लागले. बँड जोराने वाजू लागला. इतर लोक पण उठून नाचू लागले. दिव्यांची उघडमीट चालू होती. बरोबर बारा वाजता सुंदरीने चॉकलेटचा तुकडा अल्डोला तोडू दिला. बँडने मोठा गजर केला. सगळी माणसे बेभान होऊन आपापल्या टेबलांवर नाचत होती. अल्डो आता अमेरिका विसरत चालला होता. मूळचा अल्डो उफाळून नाचत होता. एवढ्यात 'डॉक्टर पिली हाय! डॉ.पिली...'अल्डोला अस्पष्ट पण ओळखीचा आवाज ऐकू आला.

त्याने टेबलावरून खाली पाहिले. ग्रोटनमधील ढालगज बया मिसेस रॉजर्स टेबलाजवळ उभी होती. अल्डो मटकन् खालीच बसला. चाळिशीच्या मिसेस रॉजर्सला एकच उद्योग होता,कुचाळक्या करत गावभर हिंडणे. आपण कित्येक वर्षे संयम पळून मिळवलेलं नाव ही बया आता खड्यात घालणार!' अल्डो मनात म्हणत होता. 'सगळ्या गावाला इथं काय झालं ते तिखटमीठ लावून सांगणार.'

सुंदरी अल्डोला खेचून उभे करण्याचा प्रयत्न करत होती. पण अल्डो टेबलाला चिकटूनच बसला होता. जेव्हा एकदा त्याने वर पहिले तेव्हा मिसेस रॉजर्स ट्रेसीशी बोलत असल्याचे त्याला दिसले.

ग्रोटनला परत आल्यावर एक-दोघा डॉक्टरांनी त्याची, 'समजलं आम्हाला तू इटलीला काय मजा मारून आलायेस ते,' असे म्हणून थट्टा केली. काही नर्सेस त्याला 'डॉ. पिली,तुम्ही इतके छान नाचता हे ठाऊक नव्हतं हो आम्हाला!' असे डोळे मिचकावत म्हणाल्या. अल्डोला अगदी मेल्यासारखे झाले. अमेरिकेतल्या ह्या छोट्या गावातील नको ती बाई आपल्याला इटलीत नेमकी नको तेव्हा भेटावी,काय हे आपलं दुर्दैव! इतक्या प्रयत्नाने सर्वांवर पाडलेली छाप फुकट गेली.' अल्डोला वाईट वाटत राहिले.

एका संध्याकाळी हॉस्पिटलमधून बाहेर पडताना त्याला मिसेस बर्नस पार्किंग लॉटमध्ये कारमध्ये बसलेली दिसली. तिच्याकडे दुर्लक्ष करून अल्डो जात होता. पण तीच अल्डोच्या दिशेने कारमधून उतरून धावत आली. "डॉ.पिली,डॉ.पिली." तिने अल्डोला हाक मारली. अल्डोचा आता नाईलाज झाला. 'गुड इव्हिनिंग मिसेस बर्नस' तिची नजर चुकवत अल्डोने अभिवादन केले.

"मिसेस रॉजर्सने तुम्हाला इटलीत न्यू इयरला संध्याकाळी भेटल्याचं सांगितलं. मला तुम्ही एवढे रसिक आणि रंगेल आहात हे एवढ्या वर्षांत कळलं नाही. मला वाटत होतं माझ्या नवऱ्याप्रमाणेच तुम्हीही कायम गंभीर आणि सुतकी. फार भाग्यवान आहे ट्रेसी. नाही तर मी. नवरा कधी हसत नाही. मजा करत नाही. कसलं हे बेचव आमचं जिणं! कंटाळा आला आहे मला त्याचा!" असे म्हणत मिसेस बर्नस हसली. पण ती खरी आतून रडतेच आहे हे अल्डोला जाणवले. त्याला काय बोलावे ते सुचेना. त्याच्या बोलण्याची वाट पाहत मिसेस बर्नस थांबलीच नाही. ती गरकन फिरून आपला चेहरा लपवत आपल्या कारच्या दिशेने चालू लागली.

गोंधळलेला अल्डो तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे आ वासून पाहतच राहिला.

पूर्व प्रसिद्धी तारेवरची कसरत
श्री विद्या प्रकाशन १९८७.